# प्रसिद्धीवृत्त

केंद्र शासनाने अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना लागू केली आहे. सदर योजनेंतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १७ मार्च २०२२ व ०७ जुलै, २०२३ या शासननिर्णयात नमूद केल्यानुसार अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची ६०% हिस्याची रक्कम महाडीबीटी प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा झाल्यानुसार विद्यार्थ्यांनी त्यांना अनुज्ञेय असलेल्या निर्वाह भत्याची रक्कम वजा करून उर्वरित शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, इतर ना परतावा शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालयास ०७ दिवसांच्या आत जमा करण्याचे निर्देश दिले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीची सन २०२१-२२ व सन २०२२-२३ वर्षातील केंद्र शासनाची ६० टक्के रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे. अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकातील ज्या विद्यार्थ्यांच्या खात्यात अशी रक्कम जमा झाली आहे अथवा काही दिवसांत जमा होणार आहे, अशा विद्यार्थ्यांनी त्या रक्कमेमधुन निर्वाह भत्याची ६० टक्के रक्कम वजा करून उर्वरित रक्कम महाविद्यालयात जमा करावी, असे आवाहन शिष्यवृत्ती पात्रताधारक विद्यार्थ्यांना समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त श्री. संतोष चिकणे यांनी केले आहे. याप्रमाणे कार्यवाही न केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची राहील, याची नोंद घ्यावी. असे पत्रकात नमूद आहे.

8.1.24

(संतोष चिकणे)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण रत्नागिरी.